ISSN 2278-8808 SJIF 2015: 5.403
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# प्राथमिक स्तरावरील औपचारिक शिक्षणासाठी 'संगीत' या माध्यमाचा उपयोग

**सुनेत्रा आफळे** *(Page 328-332)*
*संगीत शिक्षिका, कै. वा. दि. वैद्य शाळा,*
*स. प. महाविद्यालय, आवार, पुणे – ३०*

**SRJIS IMPACT FACTOR SJIF 2015**: 5.401
**Date of Issue Release:** 04/03/2017,
**Volume**: SRJIS, Jan-Feb, 2017, 4/30

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## प्रास्ताविक :–

प्राथमिक शिक्षण हा भावी शिक्षणाचा पाया आहे तर 'कलाशिक्षण' हे औपचारिक शिक्षणाचे अधिष्ठान आहे. 'सर्व ललित कलांमध्ये श्रेष्ठ' असे जिचे वर्णन आहे ती संगीत कला. प्राथमिक शिक्षण हा पुढील उच्च शिक्षणाचा पर्यायाने भावी जीवनाचा पाया असल्याने तो मजबूत असावा हे नि: संशय!

मुलांना नाचायला, बागडायला, खेळायला, गायला आवडते. ही त्यांची सहज प्रवृत्ती असते. 'संगीत कला' त्यांना ती संधी देते. संगीत ही सादरीकरणाची कला आहे. यात कृतीला पूर्णपणे वाव आहे. घडण्याच्या वयात विद्यार्थ्यांना चांगल्या संधी मिळणे, त्यांच्या संकल्पना स्पष्ट होणे हे पुढील शिक्षणाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यांच्यात असणारी उर्जा कायम राहिली पाहिजे. शिकण्याचे त्यांना दडपण वाटता कामा नये. ताण जास्त तर उर्जा कमी आणि ताण कमी तर उर्जा जास्त असते.

जागतिक अहवाल शैक्षणिक गुणवत्तेविषयी सांगतो, 'मुलांच्या अध्ययनाच्या गरजा भागवून जीवन समृध्द बनविते तेच गुणवत्ता पूर्ण शिक्षण होय.' अध्ययन–अध्यापन प्रक्रियेत आकलनाचा अडथळा न येता. आशय सुलभपणे पोहचणे आणि योग्य प्रतिसाद मिळणे यातच शिक्षणाची गुणवत्ता सामावली आहे. शिक्षक–विद्यार्थ्यांचा परस्परसंवाद, शिकवण्याच्या पध्दती, तंत्र, हातोटी, अभ्यासक्रम असे अनेक घटक विद्यार्थ्याला घडवत असतात. म्हणून जागतिक अहवालाच्या कसोटीवर उतरण्याबरोबरच जीवनाच्याही विविध पैलूंना स्पर्श करणारी संगीतकला, व्यक्तीमत्वही घडवते.

**संगीताची शिक्षणातील भूमिका–**

माणूस हा पंचेंद्रियांच्या सहाय्याने ज्ञान ग्रहण करतो. ग्रहण केलेले ज्ञान मेंदूपर्यंत पोहोचवले जाते आणि मग त्याचे रुपांतर कृतीत होते. पंचेंद्रियांपैकी ज्ञानविषयक संदेश मेंदूपर्यंत पोहोचवण्यात डोळ्यांचा फार मोठा म्हणजे ८३% एवढा वाटा असतो. त्या खालोखाल ११% वाटा कानांचा आणि इतर सर्व इंद्रियेंमिळून ६%. म्हणजे जवळजवळ ९४% ज्ञान हे डोळे आणि कान याद्वारे मिळते.

संगीत ही दृक्श्राव्य कला असल्याने या माध्यमातून मिळणारे ज्ञानही जास्त असते. संगीत कलेमध्ये गायन, वादन आणि नृत्य या तिन्ही कलांचा समावेश असतो. जेव्हा विद्यार्थी तन–मन आणि बुध्दी या तिन्ही पातळ्यांवर एखाद्या विषयाशी एकरुप होतो. ती अवस्था आकलनाच्या दृष्टीने सर्वात अनुकूल असते. नेमकी अशा प्रकारची अवस्था त्यांना संगीत कलेतून अनुभवता येते. या अवस्थेत त्यांना सांगितले जाते ते समजलेले असते. मनाला पटलेले असते आणि त्यांची कृती, प्रतिक्रिया हा त्याचा प्रतिसाद असतो. एक वेगळ्या प्रकारचा आनंद आणि आत्मिक समाधान अशा वेळी प्राप्त झालेले असते. यालाच 'ज्ञान' होणे असे म्हणता येईल. 'शिकवलेले सर्व समजले' अशी ही ज्ञानाची पायरी असते. डोळ्यांनी केलेले निरिक्षण, कानांनी टिपलेले शब्द–सूर, मनात खोलवर ठसतात आणि रुजतात. दृक्श्राव्य माध्यमांचा परिणाम हा जास्त असतो आणि अधिक वेळ टिकून राहणाराही असतो. म्हणून संगीत हे शिकवण्याचे उत्तम माध्यम ठरते.

ज्ञानेद्रियांकडून जाणाऱ्या विविध संदेशासाठी मेंदूमध्ये वेगवेगळी केंद्रे असतात. मेंदूच्या डाव्या भागात कारण मिमांसा, वाचा, भाषा, स्पष्टीकरण, गणित अशा सारख्या गोष्टी तर उजव्या भागात जाणीवा, आवड, कला, संगीत, कल्पना शक्ती, मानसिक पातळीवर प्रतिमा तयार करणे इत्यादी केंद्रे असतात. डाव्या मेंदूद्वारे शरीराची उजवी बाजू नियंत्रित केली जाते. तर उजव्या मेंदू द्वारे शरीराच्या डाव्या बाजूवर नियंत्रण राखले जाते. जेव्हा उजव्या–डाव्या मेंदूचा ताळमेळ व्यवस्थित प्रकारे होतो. तेव्हा योग्य ज्ञान प्राप्त केले जाते. एरवी उजवा मेंदू तेवढा क्रियाशील नसतो. जेव्हा संगीत अध्ययनाशी जोडले जाते तेव्हा मिळणारा परिणाम जास्त असतो.

**इतर विषयांच्या अध्यापनाचे माध्यम –**

संगीत हे तीन प्रकारे काम करते – कला म्हणून, इतर विषय शिकण्याचे माध्यम म्हणून आणि उपचाराक/समुपदेशक म्हणून. चांगले कलागुण असलेला विद्यार्थी कलाकार म्हणून घडविता येतो. जे अभ्याविषयक रुक्ष वाटतात, ज्यांचे भय वाटते ते त्यांना गुण असल्यामुळे वाटू शकते. वाढती स्पर्धा, इतरांचा

दबाव, संकल्पना स्पष्ट नसणे, न्यूनगंड अशी अनेक कारणे काही विशिष्ट विषयांच्या नावडीमागे असू शकतात. अशावेळी संगीताच्या मदतीने हे विषय सोपे तर होतातच तर त्या विषयी रुचीही वाढते.

बघणे समजणे ⟶ लक्षात राहणे ⟶ पाठ होणे ⟶

अशी ही आनंददायी प्रक्रिया असते. एखाद्या क्रियेत जेव्हा आनंद घेता येतो तेव्हा दडपण जाणवत नाही. आवडीच्या गोष्टी, उपक्रम करतांना मुलांना जबरदस्तीही करावी लागत नाही. समजले नाही असे होत नाही कारण समजल्यावरच मजा घेता येते.

गणितासारख्या विषयावर अनेक विनोद होतात; रुक्ष म्हणून कधीकधी टिकेचे धनीही व्हावे लागते. पण हाच विषय किती रंजक आहे हे संगीतातून शिकताना कळतो. बेरीज–वजाबाकी सारख्या मूलभूत क्रिया सोप्या पध्दतीने तालासुरात शिकविता येतात. शांता शेळके यांच्या ‘दहा बाई चिमण्या’ याचे उदाहरण यासाठी घेता येईल. अगदी पहिल्या इयत्तेत मुलांना बोटे काढून दाखवत अभिनय करुन हे गीत शिकवले तर वजाबाकी पक्कीच होते. ठेक्यावर शिकवले तर पाठही लगेच होते. समीकरणे वगैरेही गाण्यातून शिकवल्यास पाठ होतात.

भाषा म्हणजे शाब्दिक अभिव्यक्ती. पण भाषा शब्दातून अभिव्यक्त होताना त्यांचा अर्थ घेऊन प्रगटली पाहिजे. संगीतातून भाषिक कौशल्ये, निरनिराळी शब्द शिकताना शब्दभांडार समृध्द होते. चालीवर कविता म्हणल्या तर पाठांतर लवकर होते. इतर भाषेतील गीते, कविता गाताना वेगळ्या भाषेची ओळख होते. शब्दाचे महत्त्व, विरामचिन्हांचा उपयोग, ऱ्हस्व–दीर्घ फरक समजतो. उदा. जवळ हा शब्द, जवऽऽऽऽळ असा गायला तर त्याचा ‘समीप’ हा अर्थच त्यातून व्यक्त होत नाही तसेच ‘दूर’ हा शब्द पटकन उच्चारला तर तो ऱ्हस्व होतो. (दुर). उच्चारण योग्य आणि स्पष्ट होण्यासाठी संगीत सहाय्यभूत ठरते.

कधीकधी संगीतात नाट्यकलाही अंतर्भूत होते. मुले गातांना हातवारे करतात, हावभाव दर्शवितात, नाचतात. मनातल्या भावना कृतीतून दाखवणे इथे मुले शिकतात. नृत्यात अभिनय असतो, विविध रसांची उत्पत्ती होते. यातूनच एखादा चांगला नृत्यकलाकार, अभिनेता, हेरता येतो. याठिकाणी पार्श्वसंगीताचाही भाग येतो. आजुबाजूच्या वस्तूंमधून संगीताची निर्मिती करुन पार्श्वसंगीतासारखा वापर करता येतो. एक वेगळाच अनुभव विद्यार्थ्यांना देता येतो. नारळाच्या करवंट्या, छोटे दगड, पानाची पिपाणी अशा अनेक गोष्टींतून संगीत निर्माण करता येते.

चित्रकलेसारखा विषय एकात्मिक सादरीकरणाद्वारे शिकविता येते. गीत शिकविताना फळ्यावर समर्पक चित्रे काढली तर ते चित्र आणि शब्दाचा अर्थ लगेच कळतो. डोळ्यांना दिसणारी प्रतिमा आणि शब्द–सुरातून त्या प्रतिमेला जोडलेला, मनाला जाणवणारा अर्थ यांची सांगड घातली जाते. चित्राची जागा, काढतानाची पध्दत या साऱ्या गोष्टी गीतांच्या सुरांबरोबर डोळे आणि कानांद्वारे मेंदूपर्यंत जाऊन ठसतात.

संगीतामुळे मुलांचे मानसशास्त्र जाणून घेणे सोपे होते. त्यानुसार अध्यापनतंत्राची आखणी शिक्षकाला करता येते.

संगीताचा आरोग्यशास्त्राशीही जवळचा संबंध आहे. गायनातून दीर्घ श्वसन होते जे उत्तम आरोग्याचे लक्षण म्हणून सांगितले आहे. सहजश्वसनामुळे ताण कमी होतो, शरीर शिथिल होते. परिणामी मानसिक संतुलन साधले जाते. नृत्य हालचालींमुळे शरीरात लवचिकता येते. 'लय' हा संगीताचा आणि जीवनाचाही महत्त्वाचा घटक आहे. लयीत केल्या जाणाऱ्या गोष्टींचा परिणाम वेगळा आणि चांगला मिळतो. ॐकारा सारखा अनाहत नाद एकाग्रतेसाठी चांगला उपाय आहे. तोतरेपणा, बोबडेपणा यासाठीही संगीत उपचारक आणि उपकारक ठरते. बॅण्डच्या तालावर, संगीताच्या तालावर केलेले व्यायामप्रकार जास्त परिणामकारकत ठरतात. व्यायामाचा शरीराला तर संगीताचा मनाला असा दुहेरी लाभ घेता येतो. टाळ्या, चुटक्या, पाय आपटणे अशा लयबध्द हालचालीतून विविध प्रकारचे फायदे होतात. मुले वेगवेगळ्या परिस्थितीतून, मन:स्थितीतून शाळेत येत असतात. त्यांना एकाच मानसिक पातळीवर आणून अध्ययानुकूल बनवण्याचे कार्य संगीत करते. अभ्यासविषयांच्या मध्ये एखादी तासिका संगीताची असावी जेणेकरुन विद्यार्थी ताजेतवाने होऊन पुढच्या तासिकेसाठी सिध्द होतात. इथे संगीत हे उपचारक म्हणून कार्य करते. अतिक्रियाशील मुलांना मंद, शांत संगीत तर मंदगती विद्यार्थ्यांना जलद लयीचे संगीत ऐकवून त्यांच्यातील बदल, प्रगतीची नोंद घेता येते.

**संगीतातून आकलनाचे फायदे –**

संगीत हे संवाद साधण्याचे प्रभावी माध्यम आहे. नाद आणि लय हे संगीताचे घटक. प्रत्येक नादाला परिणाम असतो. आवाजाचे चढउतार (Volume) आणि लय कमी जास्त केल्याने मिळणाऱ्या परिणामात बदल होतात. शब्द सूर, वाद्ये यांचा एकत्रित परिणामही वेगळा असतो. म्हणूनच वेगवेगळे गीतप्रकार– पोवाडा, देशभक्तीगीत, अभंग, कविता त्या त्या वेळी, त्या त्या प्रसंगी मनाला भावतात. त्यातील उपदेश, भावना समजते.

संगीत शाब्दिक आणि अशाब्दिक अशा दोन्ही प्रकारे काम करते आणि पाठ्यमुद्दा, आशय विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवते. संगीताचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष उपयोग विशिष्ट अभ्यासविषय शिकविताना होतो. एकल किंवा सोलो सादरीकरणातून कलागुण कळतात. तर सामूहिक कृतीतून संघटना, शिस्त, आधारातून येणारा आत्मविश्वास असे परिणाम मिळतात. शिक्षक कल्पकतेने कोणत्या उपक्रमांची योजना कोणत्या आशयासाठी करतो हे त्याचे कौशल्य असते. काही संकल्पना, गाण्यातील शब्दातून–सुराद्वारे स्पष्ट होतात तर काही, नृत्यहालचाली हावभावातून. नादाचा सूर झाला आणि त्याला शब्द–कृतीची जोड मिळाली तर आकलनाचा टक्का वाढतो.

**प्रभावी माध्यम –**

विषय संगीतातून शिकवला गेला तर मनोरंजन होतेच आणि तो घटक शिकण्याचे दडपणही नसते. आवडीचे गीत गाण्यास, नृत्य करण्यास विद्यार्थी वारंवार आग्रह धरतात. त्यातून आपोआप सराव होतो. घोकंपट्टी न ठरता तो सराव होतो. एकाच क्रियेतून अनेक गोष्टी (अध्ययन, पाठ्यांश, समूहबांधणी, भावनांचा अविष्कार, इतर विषयांशी समवाय इत्यादी) साधल्या जातात. शास्त्र सांगते की, संगीत न शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा संगीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती जलद होते. म्हणूनच अगदी कलाकार घडले नाहीत तरी अभ्यासविषयांच्या सुलभ आकलनासाठी संगीताचे सहाय्य घेऊन शिक्षकांनी 'सुलभकाची' भूमिका बजावावी आणि विद्यार्थ्यांची शालेय वाटचाल संगीतमय, सुखकर करावी.

**संदर्भ**

*संगीतशास्त्र परिचय – मोहना मार्डीकर*
*सांगीतिक कान, मोजमाप व सुधारणा – डॉ. गो. का. केतकर*
*ॐकारसाधना – डॉ. गो. का. केतकर*
*सूर संजीवन – पं. शशांक कट्टी*
*शिक्षणस्वातंत्र्याची पहाट – प्रदीप आगाशे*